DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1

1/1280100/2025

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

File No.: DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1/ E-Comp. No.: 879848

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय: राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करणेबाबत.**

**संदर्भ:**
1. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.१६.१०.२०२३
2. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.२८.११.२०२३
3. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/विवि/२०२३/मवि- ०१/१६२४३ दि. ०६.१२.२०२३
4. संचालनालयाचे पत्र क्र. DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1/ E-Comp. No.: 879848दि. १७.१०.२०२४

उपरोक्त विषयी, संदर्भांकीत शासन निर्णय व संचालनालयाच्या पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या विमा योजनांचा आढावा घेऊन योजनांची व लाभांची विविधता लक्षात घेता सर्व समावेशक एकछत्री नवीन विमा योजना लागू करण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ व दि. २८.११.२०२३ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ' स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility , Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये दिलेल्या आहेत. तसेच याबाबतचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. संचालनालयाचे संदर्भांकीत पत्रान्वये आपल्या कार्यकक्षेतील विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी तसेच पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी करण्याबावत निर्देश देण्यात आलेले आहेत.

Kiran Lavlage

Scanned with OKEN Scanner

तथापि सदर योजनेबाबत विद्यापीठांकडून पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठांना खालीलप्रमाणे पुनश्च: निर्देश देण्यात येत आहेत.

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उक्त निर्देशानुसार स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 09-06-2025 12:51:42
**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

Scanned with OKEN Scanner